भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# भारतीय निखात-निधि अधिनियम, १८७८

(सन १८७८ चा अधिनियम क्रमांक ६)

[१ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान]

# The Indian Treasure-Trove Act, 1878

## (Act No. 6 of 1878)

*[As in force on the 1st March 1989]*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

१९९१

[किंमत : रु. १.२०]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च, १९८९ रोजी यथाविद्यमान असलेला दि इंडियन ट्रेझर-ट्रोव्ह ॲक्ट, १८७८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १, अंक १, दिनांक ९ जुलै, १९९० यात पृष्ठ ४९ ते ५२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ९ जुलै, १९९०.

**व्ही. एस. रमादेवी,**
सचिव, भारत सरकार.

---

# PREFACE

This edition of the Indian Treasure-Trove Act, 1878 as on the 1st March 1989 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 1, dated 9th July, 1990 on pages 49 to 52.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi, 9th July, 1990.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

एच ४७९३ (८३४—५—९१)

# भारतीय निखात-निधि अधिनियम, १८७८

## कलमांचा क्रम


कलमे

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव.
विस्तार.

२. [निरसित.]

३. निर्वचन खंड.

४. निधीच्या गवेषकाद्वारे सूचना.

५. मागणीदारांना उपस्थित राहण्यास सांगण्यासाठी अधिसूचना.

६. उपस्थित राहण्यात कसूर केल्यास हक्क गमावणे.

७. जिल्हाधिकाऱ्याने चौकशी करून निर्धारित करावयाच्या बाबी.

८. निधीबाबत हक्कमागणी करणाऱ्या व्यक्तीला दावा लावण्यासाठी द्यावयाची मुदत.

९. निधी बेवारशी असल्याचे केव्हा जाहीर करावयाचे.
अशा घोषणेविरुद्ध अपील.

१०. घोषणेनंतरची कार्यवाही.

११. जेव्हा जागेचा मालक म्हणून अन्य कोणतीही व्यक्ती हक्कमागणी करीत नाही तेव्हा, निधी गवेषकाला देणे.

१२. जेव्हा अशी एखादीच व्यक्ती हक्कमागणी करील व तिच्या हक्कमागणीबाबत विवाद नसेल तेव्हा, निधीची विभागणी करावयाची व हिस्से पक्षांकडे सुपूर्द करावयाचे.

१३. जागेच्या मालकीसंबंधात वाद असेल तर कार्यवाही स्थगित करणे.

१४. असा वाद मिटवणे.

१५. व त्यानंतर विभागणी करणे.

१६. शासनाच्या वतीने निधी संपादन करण्याची शक्ती.

१७. जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल व त्याने सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतींबद्दल त्याच्याविरुद्ध कोणताही दावा लावता येणार नाही.

१८. जिल्हाधिकाऱ्याने दिवाणी न्यायालयाच्या शक्ती वापरणे.

१९. नियम करण्याची शक्ती.

२०. सूचना देणे, इत्यादींमध्ये कसूर केल्याबद्दल गवेषकाला शिक्षा.

२१. कलम २० अन्वये अपराधास अपप्रेरणा दिल्याबद्दल मालकास शिक्षा.

अनुसूची—[निरसित].

# भारतीय निखात-निधि अधिनियम, १८७८

**(सन १८७८ चा अधिनियम क्रमांक ६)[1]**

(दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान)

[१३ फेब्रुवारी,१८७८]

**निखात-निधीसंबंधीचा कायदा विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, निखात-निधीसंबंधीचा कायदा विशोधित करणे समयोचित आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढील-प्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## प्रारंभिक

१. या अधिनियमास 'भारतीय निखात-निधि अधिनियम, १८७८' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

[2][जी राज्यक्षेत्रे १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी भाग 'ख' राज्यामध्ये अंतर्भूत होती ती क्षेत्रे] खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे. विस्तार.

[3]* * * * *

२. [अधिनियमितीचे निरसन.] विशोधन अधिनियम, १८९१ (१८९१ चा १२) द्वारे निरसित.

३. या अधिनियमात —

"निखात" याचा अर्थ मृदेमध्ये किंवा तिच्याशी निगडित असलेल्या कोणत्याही वस्तूमध्ये दडलेला कोणताही जिन्नस असा आहे; निर्वचन खंड.

"जिल्हाधिकारी" याचा अर्थ, (१) एखाद्या जिल्ह्याचा स्वतंत्र अखत्यार असलेला कोणताही महसूल अधिकारी, व (२) राज्य शासनाने या अधिनियमाखाली जिल्हाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्त केलेला कोणताही अधिकारी असा आहे;

जेव्हा कोणतीही व्यक्ती कोणतीही जमीन किंवा तिच्याशी निगडीत अशी कोणतीही वस्तू यांच्या हस्तांतरण संलेखातील कोणत्याही आरक्षण–खंडाअन्वये अशा जमिनीतील किंवा वस्तूतील निधीला हक्कदार असेल तेव्हा ती या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अशा जमिनीचा किंवा त्या वस्तूचा मालक असल्याचे मानण्यात येईल.

## निधी गवसल्यानंतरची कार्यपद्धती

४. जेव्हा केव्हा दहा रुपयांहून अधिक रकमेचा किंवा मूल्याचा निधी गवसेल तेव्हा, गवेषकाला व्यवहार्य असेल तितक्या लवकर जिल्हाधिकाऱ्याकडे :— निधीच्या गवेषकाद्वारे सूचना.

(क) अशा निधीचे स्वरूप व रक्कम किंवा अदमासे मूल्य;

(ख) ते जेथे गवसले ती जागा ;

(ग) गवसल्याचा दिनांक,

नमूद करणारी लेखी सूचना द्यावी लागेल आणि एकतर सर्वात जवळच्या शासकीय कोषागारात तो निधी जमा करावा लागेल किंवा जिल्हाधिकारी वेळोवेळी आवश्यक करील अशा वेळी व स्थळी निधी हजर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याला योग्य वाटेल अशी प्रतिभूती त्याला जिल्हाधिकाऱ्याकडे द्यावी लागेल.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा.—भारताचे राजपत्र, १८७६, भाग पाच, पृष्ठ १४६३; विधिमंडळाच्या चर्चावृत्तासाठी पहा कित्ता; पुरवणी पृष्ठे १२८८ आणि १३२६; कित्ता. १८७८ पृष्ठे २०७. आणि २८७. हा अधिनियम 'संथाळ परगणा जमाबंदी विनियम,' (१८७२ चा ३). क. ३ द्वारे, संथाळ परगण्यांमध्ये; खोंडमाळ विधि विनियम, १९३६ (१९३६ चा ४) क. ३ आणि अनुसूचीद्वारे खोंडमाळ जिल्ह्यात ; आणि अंगुल विधि विनियम, १९३६ (१९३६ चा ५) क. ३ आणि अनुसूचीद्वारे अंगुल जिल्ह्यात अंमलात आला असल्याचे घोषित केले आहे. हजारीबाग, लोहारडाग आणि मानभूम आणि परगणा डालभूम हे अनुसूचित जिल्हे आणि जिल्हा सिंधभूममधील कोलहान येथेही अंमलात असल्याचे 'अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४' (१८७४ चा १४) च्या कलम ३ (क) खालील अधिसूचनेद्वारे घोषित करण्यात आले आहे. पहा. भारताचे राजपत्र, १८८१ भाग एक, पृष्ठ ५०४ (सध्याचा पालमाऊ जिल्हा त्यावेळी लोहारडागमध्ये होता. तो १८९४ मध्ये वेगळा करण्यात आला; लोहारडाग याला सध्या "रांची जिल्हा" म्हणतात पहा. कलकत्ता राजपत्र, १८९९, भाग एक' पृष्ठ ४४).

२. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे "भाग ख राज्ये" याऐवजी घातले.

३. "आणि तो तत्काळ अंमलात येईल" हे शब्द 'निरसन आणि विशोधन अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०)द्वारे निरसित केले.

मागणीदारांना उपस्थित राहाण्यास सांगण्यासाठी अधिसूचना.

५. कलम ४ अन्वये सूचना मिळाल्यानंतर जिल्हाधिकारी त्याला योग्य वाटेल अशी चौकशी (करावयाची असल्यास) केल्यानंतर पुढील कार्यवाही करील (ती अशी) :—

(क्) राज्य शासन याबाबतीत वेळोवेळी विहित करील अशा पद्धतीने तो विवक्षित दिनांकास (तो नमूद करून) विवक्षित निधी (त्याचे स्वरुप, रक्कम व अंदाजे मूल्य नमूद करून) विवक्षित ठिकाणी (ते नमूद करून) गवसला आहे अशा आशयाची अधिसूचना प्रसिद्ध करील आणि तीद्वारे तो, निधीवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर हक्क सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना व्यक्तिशः किंवा अभिकर्त्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यासमोर त्या अधिसूचनेत नमूद केलेल्या अशा दिवशी व अशा ठिकाणी उपस्थित राहण्यास सांगेल---असा दिवस अशा अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकाच्या चार महिने अलिकडचा नसेल, तसेच त्या दिनांकापासून सहा महिन्यानंतरचा नसेल;

(ख्) जेथे निधी गवसला असे जिल्हाधिकाऱ्याला दिसून येईल ती जागा निधी गवसल्याच्या दिनांकास गवेषकाहून अन्य व्यक्तीच्या ताब्यात असेल तर, जिल्हाधिकारी त्याचवेळेस अशा व्यक्तीवर-सुद्धा लेखी विशेष नोटीस बजावील.

उपस्थित राहाण्यात कसूर केल्यास हक्क गमावणे.

६. असा निधी जेथे गवसला त्या जागेचा मालक म्हणून किंवा अन्यथा अशा निधीवर किंवा त्याच्या एखाद्या भागावर हक्क असलेल्या व कलम ५ अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे आवश्यक केल्याप्रमाणे उपस्थित न होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला असा हक्क गमवावा लागेल.

जिल्हाधिकाऱ्याने चौकशी करून निर्धारित करावयाच्या बाबी.

७. कलम ५ अन्वये अधिसूचित केलेल्या दिवशी जिल्हाधिकारी तो निधी स्वत:समोर हजर करण्याची व्यवस्था करील, आणि —

(क्) कोणत्या व्यक्तीला, कोणत्या ठिकाणी व कोणत्या परिस्थितीत असा निधी गवसला; आणि

(ख्) शक्य असेल तेथवर कोणत्या व्यक्तीने व कोणत्या परिस्थितीत असा निधी दडवून ठेवला होता,

यासंबंधी चौकशी करून ते निर्धारित करील.

निधीबाबत हक्कमागणी करणाऱ्या व्यक्तीला दावा लावण्यासाठी द्यावयाची मुदत.

८. कलम ७ अन्वये चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास जर, उक्त अधिसूचनेद्वारे आवश्यक केल्यानुसार उपस्थित झालेल्या व अशा निधीबाबत हक्कमागणी करणाऱ्या एखाद्या व्यक्तीने किंवा अशी व्यक्ती ज्या व्यक्तीच्या पोटी हक्क सांगत आहे अशा अन्य एखाद्या व्यक्तीने निधी गवसल्याच्या दिनांकापूर्वीच्या शंभर वर्षांच्या दरम्यान निधी दडवला होता असे सकारण वाटले तर, जिल्हाधिकारी मागणीदाराला आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी दिवाणी न्यायालयात दावा मांडण्याला अवधी मिळावा यासाठी स्वत:ला पुरेसा वाटेल अशा कालावधीपर्यंत प्रकरणाची सुनावणी तहकूब करणारा आदेश देईल.

निधी बेवारशी असल्याचे केव्हा जाहीर करावयाचे.

९. अशा चौकशीनंतर जिल्हाधिकाऱ्यास निधी अशा प्रकारे दडवला होता असे समजण्यास कारण दिसत नसेल तर; किंवा कलम ८ अन्वये कालावधी निश्चित करण्यात येईल त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याच्या माहितीप्रमाणे उपरोक्त असा कोणताही दावा अशा कालावधीत मांडण्यात आला नसेल तर; किंवा

असा दावा अशा कालावधीत मांडलेला असेल व वादीची हक्कमागणी अंतिमरीत्या फेटाळण्यात आली असेल तर,

जिल्हाधिकारी तो निधी बेवारशी असल्याचे घोषित करू शकेल.

अशा घोषणेविरुद्ध अपील.

या कलमाखाली घोषणा करण्यामुळे नाराज झालेली कोणतीही व्यक्ती घोषणेच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत त्याविरुद्ध मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे अपील करू शकेल.

अशा अपीलाच्या अधीनतेने, अशी प्रत्येक घोषणा अंतिम व निर्णायक असेल.

घोषणेनंतरची कार्यवाही.

१०. जेव्हा कलम ९ अन्वये कोणत्याही निधीसंबंधी घोषणा करण्यात आलेली असेल तेव्हा, असा निधी, यात यापुढे अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार, एकतर त्याच्या गवेषकाकडे सुपूर्द करण्यात येईल, किंवा गवेषक आणि जेथे निधी गवसला त्या जागेचा मालक यांच्यामध्ये यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने विभागता येईल.

जेव्हा जागेचा मालक म्हणून अन्य कोणतीही व्यक्ती कमागणी करीत नाही तेव्हा, निधी गवेषकाला देणे.

११. जेव्हा पूर्वोक्तानुसार कोणत्याही निधीसंबंधी घोषणा करण्यात आलेली असेल, आणि कलम ५ अन्वये प्रकाशित केलेल्या अधिसूचनेद्वारे आवश्यक केल्याप्रमाणे अशा निधीच्या गवेषकाहून अन्य कोणतीही व्यक्ती उपस्थित झाली नसेल व जेथे तो गवसला त्या जागेचा मालक म्हणून निधीच्या हिश्श्याची तिने हक्कमागणी केलेली नसेल तेव्हा, जिल्हाधिकारी असा निधी त्याच्या गवेषकाकडे सुपूर्द करील.

*जेव्हा अशी एखादीच व्यक्ती हक्कमागणी करील व तिच्या हक्कमागणीबाबत विवाद नसेल तेव्हा, निधीची विभागणी करावयाची व हिस्से पक्षांकडे सुपूर्द करावयाचे.*

१२. कोणत्याही निधीसंबंधी पूर्वोक्तानुसार घोषणा करण्यात आलेली असेल, आणि अशा निधीच्या गवेषकाहून अन्य अशा फक्त एकाच व्यक्तीने उपस्थित होऊन हक्कमागणी केली असेल व अशा व्यक्तीच्या हक्कमागणीबाबत गवेषकाने विवाद उपस्थित केला नाही तर, जिल्हाधिकारी हा, तो गवेषक आणि अशी हक्कमागणी करणारी व्यक्ती यांच्यामध्ये पुढील नियमानुसार निधी विभागून देण्याची कार्यवाही करील, (ते असे) :—

गवेषक आणि याप्रमाणे हक्कमागणी करणारी व्यक्ती यांनी निधीच्या विल्हेवाटीबाबत केलेला असा कोणताही करार तेव्हा अंमलात नसेल तर, निधीपैकी तीन-चतुर्थांश हिस्सा गवेषकास नेमून दिला जाईल व उर्वरित हिस्सा त्या व्यक्तीच्या वाटचाला दिला जाईल. जर असा गवेषक व अशी व्यक्ती यांच्यामध्ये असा कोणताही करार झाला असेल तर, त्याप्रमाणे निधीची विल्हेवाट करण्यात येईल :

परंतु, जिल्हाधिकारी कोणत्याही प्रकरणी, त्याला योग्य वाटेल तर, या कलमाद्वारे निदेशित केल्याप्रमाणे कोणताही निधी विभागण्याऐवजी,—

(क) दोहोंपैकी कोणत्याही पक्षाला असा निधी संपूर्णत: किंवा त्यापैकी त्याच्या हिश्श्यापेक्षा अधिक वाटा नेमून देऊ शकेल—मात्र अशा पक्षाने जिल्हाधिकाऱ्याला अन्य पक्षाकरता/पक्षाच्या वतीने अशा अन्य पक्षाच्या हिश्श्याशी अगर, प्रकरणपरत्वे, याप्रमाणे नेमून दिलेल्या अधिक वाटाशी तुल्य म्हणून जिल्हाधिकारी ठरवील तेवढी रक्कम दिली पाहिजे; किंवा

(ख) असा निधी किंवा त्याचा कोणताही अंश जाहीर लिलावाने विकू शकेल व यात यापूर्वी विहित केलेल्या नियमानुसार पक्षांमध्ये विक्रीचे उत्पन्न विभागून देऊ शकेल :

परंतु असेही की, उक्त गवेषक किंवा जेथे निधी गवसला त्या जागेचा मालक म्हणून हक्कमागणी करणारी व्यक्ती यांहून अन्य व्यक्तीने या अधिनियमान्वये केलेली हक्कमागणी जिल्हाधिकाऱ्याने कलम ९ अन्वये केलेल्या त्याच्या घोषणेद्वारे फेटाळली असेल तेव्हा, ज्या व्यक्तीची हक्कमागणी फेटाळली गेली आहे तिच्याकडून कलम ९ अन्वये अपील दाखल न केले जाता दोन महिने संपून जाईपर्यंत किंवा जर अपील दाखल केलेले असेल तर ते खारीज होईपर्यंत अशी विभागणी करण्यात येणार नाही.

जेव्हा जिल्हाधिकाऱ्याने त्या कलमान्वये विभागणी केलेली असेल तेव्हा, तो अशा विभागणीनुसार ते पक्ष प्रत्येकी ज्यांना हक्कदार असतील असे त्या निधीपैकी ते ते हिस्से किंवा त्यांच्याऐवजी पैसे त्यांच्याकडे सुपूर्द करील.

*जागेच्या मालकी संबंधात वाद असेल तर कार्यवाही स्थगित करणे.*

१३. जेव्हा कोणत्याही निधीसंबंधी पूर्वोक्ताप्रमाणे घोषणा करण्यात आलेली असेल, आणि दोन किंवा अधिक व्यक्ती पूर्वोक्ताप्रमाणे उपस्थित झाल्या असून, त्यापैकी प्रत्येक व्यक्तीने जेथे असा निधी गवसला त्या जागेचा मालक म्हणून हक्कमागणी केली असेल अथवा अशाप्रकारे उपस्थित झालेल्या व निधीची हक्कमागणी करणाऱ्या व्यक्तीच्या हक्काबाबत अशा निधीच्या गवेषकाने वाद उपस्थित केला असेल तेव्हा, जिल्हाधिकारी असा निधी स्वत:जवळ ठेवून घेईल आणि दिवाणी न्यायालयाकडून त्या बाबीची चौकशी व निर्णय केला जावा या हेतूने तो आपली कार्यवाही स्थगित ठेवण्याचा आदेश काढील.

*असा वाद मिटवणे.*

१४. ज्या व्यक्तीने याप्रमाणे उपस्थित होऊन हक्कमागणी केलेली असेल अशी कोणतीही व्यक्ती अशा आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आपला हक्क घोषित करणारा हुकुमनामा मिळवण्यासाठी दिवाणी न्यायालयात दावा मांडू शकेल; व अशा प्रत्येक दाव्यात, निधीचा गवेषक व जिल्हाधिकाऱ्यासमोर अशा मागणीहक्काबाबत वाद उपस्थित करणाऱ्या सर्व व्यक्ती यांना प्रतिवादी करण्यात येईल.

*व त्यानंतर विभागणी करणे.*

१५. जर असा कोणताही दावा मांडण्यात आला व त्यामध्ये वादीची हक्कमागणी अंतिम रीत्या प्रस्थापित झाली तर, जिल्हाधिकारी कलम १२ च्या उपबंधांच्या अधीनतेने, तो वादी व गवेषक यांच्यामध्ये निधी विभागून देईल.

जर उपरोक्त असा कोणताही दावा मांडण्यात आला नाही, किंवा अशा सर्व दाव्यातील वादींच्या हक्कमागण्या अंतिमरीत्या फेटाळण्यात आल्या तर, जिल्हाधिकारी तो निधी गवेषकाकडे सुपूर्द करील.

*शासनाच्या वतीने निधी संपादन करण्याची शक्ती.*

१६. कलम ९ अन्वये घोषणा केल्यानंतर व यात यापूर्वी उपबंधित केल्याप्रमाणे निधी सुपूर्द करण्यापूर्वी किंवा विभागून देण्यापूर्वी केव्हाही, जिल्हाधिकारी असा निधी किंवा त्याचा कोणताही विनिर्दिष्ट अंश हा, त्याला हक्कदार असलेल्या व्यक्तींना अशा निधीतील किंवा अंशातील सामग्रीच्या मूल्याइतकी रक्कम व जोडीला अशा मूल्याच्या एक-पंचमांशाइतकी रक्कम देऊन शासनाच्या वतीने संपादन करण्याचा आपला उद्देश असल्याचे स्वाक्षरित लेखाद्वारे जाहीर करू शकेल आणि अशी रक्कम अशा व्यक्तींच्या नावावर आपल्या कोषागारात भरणा करू शकेल; व त्यानंतर असा निधी किंवा, त्याचा अंश ही शासनाची मालमत्ता असल्याचे मानण्यात येईल व अशी जमा केलेली रक्कम म्हणजे जणू काही असा निधी किंवा त्याचा अंश असावा असे समजून त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल व त्याने सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतींबद्दल त्याच्याविरुद्ध कोणताही दावा लावता येणार नाही.

१७. जिल्हाधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेला कोणताही निर्णय किंवा केलेली कृती कोणत्याही दिवाणी न्यायालयाद्वारे प्रश्नास्पद करता येणार नाही व याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करताना सद्‌भावपूर्वक केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल त्याच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कार्यवाही होऊ शकणार नाही.

जिल्हाधिकाऱ्याने दिवाणी न्यायालयाच्या शक्ती वापरणे.

१८. या अधिनियमान्वये कोणतीही चौकशी करणारा जिल्हाधिकारी दाव्यांच्या संपरीक्षेसाठी दिवाणी न्यायालयाला [1]"दिवाणी प्रक्रिया संहिते' द्वारे प्रदान करण्यात आलेली कोणतीही शक्ती वापरू शकेल.

नियम करण्याची शक्ती.

१९. राज्य शासन याखालील कार्यवाहीचे विनियमन करण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असे नियम वेळोवेळी करू शकेल;

असे नियम **शासकीय राजपत्रात** प्रकाशित झाल्यानंतर कायद्याइतकेच प्रभावी होतील.

सूचना देणे, इत्यादींमध्ये कसूर केल्याबद्दल गवेषकाला शिक्षा.

२०. जर कोणत्याही निधीच्या गवेषकाने कलम ४ द्वारे आवश्यक असल्यानुसार नोटीस देण्यात कसूर केली किंवा रक्कम जमा केली नाही किंवा प्रतिभूती दिली नाही तर अथवा निधीची ओळख पटू नये म्हणून त्यात फेरबदल केला किंवा तो बदलण्याचा प्रयत्न केला तर, अशा निधीपैकी ज्या हिश्श्यास किंवा त्याच्या ऐवजीच्या ज्या पैशास तो अन्यथा हक्कदार होऊ शकेल तो शासनाकडे निहित होईल;

व दंडाधिकाऱ्यासमक्ष दोषसिद्धी झाल्यावर त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कलम २० अन्वये अपराधास अपप्रेरणा दिल्याबद्दल मालकास शिक्षा.

२१. ज्या जागेत कोणताही निधी गवसला असेल त्याच्या मालकाने कलम २० खालील कोणत्याही अपराधास 'भारतीय दंड संहिता १८६०' (१८६० चा ४५) याच्या अर्थानुसार अपप्रेरणा दिल्यास, अशा निधीपैकी ज्या हिश्श्यास किंवा त्याच्या ऐवजीच्या ज्या पैशास तो अन्यथा हक्कदार होऊ शकेल तो शासनाकडे निहित होईल,

व दंडाधिकाऱ्यासमक्ष दोषसिद्धी झाल्यावर त्याला सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**अनुसूची** [विशोधन अधिनियम, १८९१ (१८९१ चा १२) याद्वारे निरसित].

---

१. आता पहा: 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई